नागरिकांच्या सहभागातून प्रशासकीय, प्रक्रियात्मक, तांत्रिक व संरचनात्मक सुधारणा सुचविणे, त्यांचे परीक्षण करणे व त्यांची कालबद्ध अंमलबजावणी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या "सुधारणा उत्सव" (Reform Utsav) या राष्ट्रव्यापी अभियानाची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक रिफॉर्म-२०२६/प्र.क्र.८९/रवका-२

मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक :- ०१ सप्टेंबर, २०२६.

<u>**संदर्भ**</u> :- भारत सरकार, आर्थिक व्यवहार विभाग (Department of Economic Affairs) यांच्याकडून प्राप्त "रिफॉर्म उत्सव" संकल्पना टिपण व सादरीकरण.

<u>**प्रस्तावना.**</u>

शासनाच्या प्रशासकीय यंत्रणेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढवून विद्यमान शासकीय प्रक्रिया, नियम, कार्यपद्धती व सेवा वितरण प्रणाली यामध्ये आवश्यक त्या पद्धतशीर व संरचनात्मक सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. "सुधारणा उत्सव (Reform Utsav)" हा नागरिकांच्या सहभागातून प्रशासकीय सुधारणांबाबतच्या सूचना प्राप्त करून त्यांचे परीक्षण, वर्गीकरण व अंमलबजावणी करण्यासाठीचा कालबद्ध उपक्रम आहे. या उपक्रमाचा केंद्रबिंदू नागरिकांच्या सूचनांचे प्रत्यक्ष, कार्यक्षम व परिणामकारक सुधारणांमध्ये रूपांतर करणे हा आहे. सदर अभियानामध्ये जन मंथन (Discover), विमर्श (Deliberate) आणि जन समाधान(Deliver) या तीन प्रमुख टप्प्यांद्वारे नागरिकांच्या सूचनांचे संकलन, विभागीय स्तरावर परीक्षण व सुधारणा सूचनांची अंमलबजावणी करण्याचे नियोजन आहे. त्याअनुषंगाने राज्यामध्ये सुधारणा उत्सव (Reform Utsav)-२०२६ अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>**शासन निर्णय**</u>**.**

<u>अभियानाची उद्दिष्टे</u>:-

राज्यात सुधारणा उत्सव अभियान राबविण्याचा प्रमुख उद्देश नागरिकांच्या प्रत्यक्ष अनुभवातून शासनाच्या कार्यपद्धतीतील अडथळे, अनावश्यक प्रक्रिया, अनुपालनाचा भार

आणि सेवा वितरणातील त्रुटी ओळखून त्यांमध्ये आवश्यक सुधारणा करणे हा आहे. त्याद्वारे शासकीय सेवा प्राप्त करण्यासाठी लागणारा वेळ, आवश्यक कागदपत्रे, नागरिकांच्या कार्यालयीन भेटी, मंजुरीच्या अनावश्यक पातळ्या आणि प्रक्रियात्मक अडथळे कमी करून शासन सेवा अधिक सुलभ, गतिमान, पारदर्शक व नागरिकाभिमुख करण्यावर भर देण्यात यावा. तसेच, शक्य तेथे डिजिटल माध्यमांचा वापर वाढविणे, विविध शासकीय प्रणालींमध्ये माहितीची देवाणघेवाण सुलभ करणे, नागरिकांकडून एकाच माहितीची किंवा कागदपत्रांची पुनरावृत्ती टाळणे, आंतर-विभागीय समन्वय वाढविणे, कालबाह्य अथवा अनावश्यक नियम व प्रक्रियांचे पुनरावलोकन करणे, निर्णयप्रक्रियेतील अनावश्यक टप्पे कमी करणे आणि शासनाच्या सेवा वितरण व्यवस्थेत परिणामाभिमुख सुधारणा घडवून आणणे ही अभियानाची प्रमुख उद्दिष्टे राहतील.

एखाद्या विभागात किंवा जिल्ह्यात यशस्वी ठरलेली सुधारणा इतर विभाग, जिल्हे किंवा सेवांमध्ये लागू करता येईल अशा स्वरूपात विकसित करणे तसेच सुधारणा केवळ प्रक्रियात्मक बदलापुरती मर्यादित न ठेवता तिचा नागरिकांवर होणारा प्रत्यक्ष परिणाम मोजणे यावरही अभियानामध्ये भर देण्यात यावा.

२. <u>अभियानाची व्याप्ती</u>:-

सुधारणा उत्सव अभियानाची व्याप्ती राज्य शासनाच्या सर्व प्रशासकीय विभागांशी संबंधित नियम, प्रक्रिया, कार्यपद्धती, सेवा वितरण व्यवस्था, अर्ज व नोंदणी प्रक्रिया, प्रमाणपत्रे, परवाने व मान्यता, मंजुरी व ना-हरकत प्रमाणपत्रे, नागरिक व व्यवसायांसाठीचे अनुपालन, दस्तऐवजांची आवश्यकता, विभागीय व आंतर-विभागीय कार्यपद्धती, डिजिटल सेवा, माहिती तंत्रज्ञान प्रणाली, विदा (डेटा) देवाणघेवाण, संस्थात्मक रचना, निर्णय प्रक्रिया, निरीक्षण व अहवाल प्रणाली तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील संरचनात्मक अडथळे या बाबींशी संबंधित राहील.

अभियानांतर्गत प्राप्त सूचनांचे परीक्षण करताना विद्यमान कायदे, नियम, शासन निर्णय, प्रशासकीय अधिकारक्षेत्र आणि उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदी यांचा विचार करण्यात यावा. कायदा किंवा नियमांमध्ये बदल आवश्यक असलेल्या बाबींवर संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची आवश्यक मान्यता घेऊन स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात यावी.

<u>३. सुधारणा व वैयक्तिक तक्रार यांतील फरक</u>:-

सुधारणा उत्सव अभियानांतर्गत प्राप्त होणारी सूचना ही केवळ एखाद्या व्यक्तीच्या प्रकरणाचे निराकरण करणारी नसून समान परिस्थितीत असलेल्या नागरिकांना किंवा संबंधित घटकांना लागू होणाऱ्या व्यवस्थेमध्ये सुधारणा करणारी असणे अपेक्षित आहे.

उदा. एखाद्या नागरिकाचे प्रमाणपत्र प्रलंबित असल्याबाबतची तक्रार ही वैयक्तिक तक्रार ठरेल. तथापि, संबंधित प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली माहिती अन्य शासकीय डेटाबेसमध्ये उपलब्ध असतानाही ती नागरिकाकडून पुन्हा मागविण्याची आवश्यकता रद्द करण्याबाबतची सूचना ही सर्व नागरिकांना लागू होणारी प्रक्रियात्मक सुधारणा ठरू शकते. त्याचप्रमाणे, एखाद्या कार्यालयातील विशिष्ट अधिकाऱ्याच्या विलंबाबाबतची तक्रार ही सुधारणा सूचना नसली, तरी संपूर्ण राज्यात संबंधित सेवेसाठी असलेला अनावश्यक मंजुरीचा टप्पा दूर करण्याबाबतची सूचना ही संरचनात्मक सुधारणा ठरू शकते. त्यामुळे वैयक्तिक तक्रारीतून शासनाच्या नियम, प्रक्रिया, तंत्रज्ञान किंवा संस्थात्मक व्यवस्थेतील सर्वसाधारण स्वरूपाची त्रुटी निदर्शनास येत असल्यास, त्या तक्रारीतील संरचनात्मक मुद्द्याचा स्वतंत्र सुधारणा सूचना म्हणून विचार करता येईल.

<u>४. सुधारणा प्रक्रियेची मूलभूत तत्त्वे</u>:-

अभियानाची अंमलबजावणी नागरिक-केंद्रितता, प्रक्रियेचे सुलभीकरण, आवश्यकतेपुरता शासन हस्तक्षेप, डिजिटल माध्यमास प्राधान्य, माहिती एकदाच सादर करण्याचे तत्त्व, शासकीय प्रणालींमधील परस्पर माहिती देवाणघेवाण, कालबद्ध सेवा वितरण, पारदर्शकता, उत्तरदायित्व, पुनरावृत्तीक्षमता, व्याप्तीक्षमता आणि परिणामाभिमुखता या तत्त्वांच्या आधारे करण्यात यावी.

शासकीय सेवा अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने नागरिकांकडून एकाच माहितीची किंवा कागदपत्रांची पुनरावृत्ती टाळणे, उपलब्ध शासकीय डेटाचा प्रभावी वापर करणे, शक्य तेथे प्रत्यक्ष कार्यालयीन भेटी कमी करणे, प्रक्रिया व मंजुरीचे अनावश्यक टप्पे दूर करणे आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सेवा वितरण सुलभ करणे यांना प्राधान्य देण्यात यावे.

<u>५. नागरिकांच्या सूचनेपासून सुधारणा अंमलबजावणीपर्यंतची कार्यपद्धती</u>:-

अभियानांतर्गत प्राप्त प्रत्येक ग्राह्य सूचना ही प्राथमिक छाननी, सुधारणा म्हणून पात्रतेची तपासणी, संबंधित विभागाकडे वर्गीकरण, विभागीय परीक्षण, सुधारणा प्रकाराचे वर्गीकरण,

निर्णय, अंमलबजावणी, परिणाम मोजमाप, पोर्टलवर सद्य:स्थिती अद्ययावत करणे आणि पाठपुरावा या टप्प्यांतून जाईल.प्राप्त सूचनांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता, त्याची व्याप्ती, अपेक्षित परिणाम, अंमलबजावणीची व्यवहार्यता आणि संबंधित विभाग यांचे परीक्षण करून त्यानुसार पुढील कार्यवाही निश्चित करण्यात यावी.

<u>६. सुधारणा सूचनांचे परीक्षण</u>:-

प्राप्त सूचना "सुधारणा" म्हणून स्वीकारण्यापूर्वी परिशिष्ट-५ मध्ये नमूद केलेल्या पाच निकषांच्या आधारे तिचे परीक्षण करणे आवश्यक राहील. सदर सूचना सर्वसाधारण स्वरूपाची, संरचनात्मक मूळ कारणावर आधारित, भविष्यलक्ष्यी, पुनरावृत्तीक्षम/व्याप्तीक्षम आणि रचनात्मक स्वरूपाची असणे अपेक्षित आहे. सूचना वरील निकषांनुसार पात्र ठरत नसल्यास ती सुधारणा म्हणून स्वीकारण्यात येऊ नये. तथापि, आवश्यकतेनुसार संबंधित बाब इतर उपलब्ध तक्रार निवारण किंवा सेवा वितरण यंत्रणेकडे वर्ग करण्यात यावी.

<u>७. सुधारणा सुचनांमधून वगळण्यात येणाऱ्या सूचना</u>:-

वैयक्तिक तक्रारी, प्रलंबित वैयक्तिक प्रकरणांचे निराकरण, आक्षेपार्ह अथवा द्वेषपूर्ण मजकूर, स्पॅम किंवा अरचनात्मक सूचना, विशिष्ट ठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या मागण्या, वैयक्तिक वेतन किंवा सेवाशर्तीतील बदलाच्या मागण्या, विशिष्ट कर दर अथवा शुल्कातील बदलाच्या मागण्या, कोणत्याही विशिष्ट सेवा किंवा प्रक्रियेशी संबंध नसलेल्या राजकीय किंवा सर्वसाधारण घोषणा, आधीच अमलात असलेल्या किंवा प्रक्रियेत असलेल्या बाबी तसेच न्यायप्रविष्ट बाबी "सुधारणा" म्हणून वर्गीकृत करण्यात येऊ नयेत. तथापि, अशा सूचनांमधून व्यापक स्वरूपाची संरचनात्मक सुधारणा ओळखता येत असल्यास, त्या संरचनात्मक मुद्द्याचा स्वतंत्रपणे विचार करण्यात येऊ शकतो.

<u>८. सुधारणा सूचनांचे वर्गीकरण</u>:-

परीक्षणानंतर ग्राह्य ठरलेल्या सुधारणांचे अल्पकालीन सुधारणा (Quick Wins), मध्यमकालीन सुधारणा (Medium-term Reforms) आणि संरचनात्मक सुधारणा (Structural Reforms) अशा तीन प्रमुख प्रकारांत वर्गीकरण करण्यात यावे.

विद्यमान अधिकार, प्रक्रिया व उपलब्ध संसाधनांच्या चौकटीत अल्प कालावधीत अंमलबजावणी करता येणाऱ्या सुधारणांचा समावेश Quick Wins मध्ये करण्यात यावा. ज्या सुधारणांसाठी प्रक्रिया बदल, शासन निर्णय, नियमांमध्ये सुधारणा, तांत्रिक बदल, आंतर-

विभागीय समन्वय किंवा इतर प्रशासकीय कार्यवाही आवश्यक आहे, त्यांचा समावेश Medium-term Reforms मध्ये करण्यात यावा. कायदेशीर, धोरणात्मक, संस्थात्मक, तांत्रिक किंवा आंतर-विभागीय पातळीवर व्यापक बदल आवश्यक असलेल्या सुधारणांचा समावेश Structural Reforms मध्ये करण्यात यावा.

९. अभियानाची कालमर्यादा व टप्पे:-

सुधारणा उत्सव अभियानाची राज्यातील अंमलबजावणी ऑगस्ट २०२६ पासून सुरू होऊन त्याचे मुख्य अभियान दिनांक २ ऑक्टोबर २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात यावे. अभियानाची टप्पानिहाय कालमर्यादा परिशिष्ट-४ मध्ये नमूद करण्यात आली आहे. दिनांक १२ ऑगस्ट २०२६ पासून राज्य व जिल्हास्तरीय प्रशासकीय यंत्रणेचे अभियानाची उद्दिष्टे, कार्यपद्धती, पोर्टलचा वापर, सुधारणा निकष, विभागीय जबाबदाऱ्या आणि केंद्र शासनाशी समन्वय याबाबत संवेदीकरण करण्यात यावे.

भारत सरकारच्या आर्थिक व्यवहार विभागाकडून विहित नमुना प्राप्त झाल्यानंतर सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्याशी संबंधित State Action Plan तयार करावा. सदर नमुना दिनांक २० ऑगस्ट २०२६ पर्यंत प्राप्त होणे अपेक्षित असून, सर्व विभागांनी आपला कृती आराखडा दिनांक १० सप्टेंबर २०२६ पर्यंत राज्य नोडल अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

दिनांक ११ सप्टेंबर २०२६ पासून राज्यभर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. सदर मोहिमेसाठी डिजिटल माध्यमे, सामाजिक माध्यमे, प्रसारमाध्यमे, ग्रामपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थांची यंत्रणा, शैक्षणिक संस्था, उद्योग व व्यावसायिक संघटना, स्वयंसेवी संस्था तसेच इतर संबंधित भागधारकांचा उपयोग करण्यात यावा.

१०. जन मंथन - सुधारणा शोध टप्पा:-

दिनांक २ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर “जन मंथन” अभियान राबविण्यात यावे. प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर किमान एक जन मंथन सभा आयोजित करण्यात यावी. आवश्यकतेनुसार नागरी भागातही तत्सम कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी संबंधित लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त तसेच संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी किमान एका ग्रामसभा/जन मंथन कार्यक्रमास उपस्थित राहून नागरिकांशी संवाद साधावा.

नागरिकांकडून सुधारणा सूचना “रिफॉर्म उत्सव” पोर्टल तसेच अधिकृत मदत कक्षामार्फत स्वीकारण्यात याव्यात. प्रत्येक सूचनेची डिजिटल नोंदणी करून तिला अद्वितीय क्रमांक देण्यात यावा. नागरिकांकडून सूचना स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२.०० वाजता बंद करण्यात यावी.

११. विमर्श - परीक्षण व विचारविनिमय टप्पा:-

दिनांक १० ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत संबंधित प्रशासकीय विभागांनी प्राप्त सूचनांचे परीक्षण करावे. प्रत्येक सूचनेचे परिशिष्ट-५ मध्ये नमूद निकषांनुसार परीक्षण करून तिचे योग्य वर्गीकरण करण्यात यावे.

एकापेक्षा अधिक विभागांशी संबंधित, धोरणात्मक स्वरूपाच्या किंवा राज्यस्तरीय निर्णयाची आवश्यकता असलेल्या सुधारणांचा विचार राज्य समन्वय समितीच्या स्तरावर करण्यात यावा.

१२. जन समाधान - सुधारणा अंमलबजावणी टप्पा:-

दिनांक १० ऑक्टोबर ते २० डिसेंबर २०२६ या कालावधीत शक्य तितक्या Quick Wins ची अंमलबजावणी करण्यास प्राधान्य देण्यात यावे. अंमलबजावणी पूर्ण झालेल्या सुधारणांची सद्य:स्थिती “रिफॉर्म उत्सव” पोर्टलवर निर्धारित कालावधीत अद्ययावत करण्यात यावी.

मध्यमकालीन व संरचनात्मक सुधारणांसाठी संबंधित विभागांनी स्वतंत्र अंमलबजावणी आराखडा तयार करावा. सदर आराखड्यामध्ये सुधारणा, अपेक्षित परिणाम, जबाबदार विभाग व अधिकारी, आवश्यक प्रशासकीय/कायदेशीर बदल, तांत्रिक आवश्यकता, आर्थिक परिणाम, अंमलबजावणीची कालमर्यादा आणि परिणाम निर्देशक यांचा समावेश करण्यात यावा.

१३. संकल्प सिद्धी:-

दिनांक २५ ते २७ डिसेंबर २०२६ या कालावधीत राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय “संकल्प सिद्धी” कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. सदर कार्यक्रमांमध्ये अभियानातील राज्याची कामगिरी, प्राप्त व स्वीकारलेल्या सुधारणांचा आढावा, पूर्ण झालेल्या सुधारणांची

निष्पत्ती, उत्कृष्ट सुधारणा व यशोगाथांचे सादरीकरण तसेच उल्लेखनीय योगदान देणारे नागरिक, अधिकारी, कर्मचारी व जिल्हे यांचा गौरव करण्यात यावा.

१४. पाठपुरावा व संस्थात्मक रूपांतरः-

दिनांक २८ डिसेंबर २०२६ पासून पुढे मध्यमकालीन व संरचनात्मक सुधारणांचा नियमित पाठपुरावा करण्यात यावा. संबंधित विभागांनी सुधारणांच्या अंमलबजावणीबाबत कृती अहवाल (Action Taken Report) (ATR) निर्धारित कालावधीत राज्य नोडल अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

सुधारणा उत्सव हे केवळ मर्यादित कालावधीतील अभियान म्हणून न पाहता, अभियानातून निदर्शनास आलेल्या उपयुक्त संरचनात्मक सुधारणांना संबंधित विभागांच्या नियमित प्रशासकीय कार्यपद्धतीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

१५. रिफॉर्म उत्सव पोर्टल व डॅशबोर्डः-

नागरिकांकडून प्राप्त सूचना ते त्यांच्या अंमलबजावणीपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचे डिजिटल सनियंत्रण करण्यासाठी “रिफॉर्म उत्सव” पोर्टल व डॅशबोर्डचा वापर करण्यात यावा.

पोर्टलवर प्राप्त सूचनांची संख्या, जिल्हानिहाय व विभागनिहाय वर्गीकरण, ग्राह्य ठरलेल्या सुधारणा, Quick Wins, Medium-term Reforms, Structural Reforms, पूर्ण झालेल्या सुधारणा, प्रलंबित सुधारणा आणि अंमलबजावणीची सद्य:स्थिती यांचे सनियंत्रण करण्यात यावे.

सूचनांच्या प्राथमिक वर्गीकरणासाठी आवश्यकतेनुसार कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधनांचा वापर करता येईल. तथापि, अशा प्रणालीद्वारे केलेले वर्गीकरण हे सहायक स्वरूपाचे राहील आणि अंतिम निर्णय संबंधित अधिकृत अधिकारी/विभागाकडूनच घेण्यात यावा.

१६. पारदर्शकता व नागरिकांना माहिती:-

अभियानाच्या स्वरूपानुसार आणि उपलब्ध तांत्रिक सुविधांच्या आधारे नागरिकांना त्यांच्या सूचनेच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती उपलब्ध करून देण्यात यावी. राज्यस्तरीय डॅशबोर्डद्वारे अभियानातील एकूण प्रगती, स्वीकारलेल्या सुधारणांची संख्या, पूर्ण झालेल्या सुधारणांची

संख्या आणि प्रलंबित सुधारणांची सद्य:स्थिती पारदर्शकपणे प्रदर्शित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

१७. परिणाम मोजमाप व कामगिरी निर्देशक:-

सुधारणा केवळ अमलात आणली की नाही यापेक्षा तिच्यामुळे नागरिकांना झालेला प्रत्यक्ष लाभ मोजण्यावर भर देण्यात यावा. त्यासाठी आवश्यकतेनुसार सेवा वितरणासाठी लागणारा कालावधी, आवश्यक कागदपत्रांची संख्या, नागरिकांच्या कार्यालयीन भेटींची संख्या, मंजुरीच्या टप्प्यांची संख्या, अनुपालनाचा भार, डिजिटल सेवांचा वापर, प्रलंबित प्रकरणांमध्ये झालेली घट, नागरिक समाधान, आर्थिक बचत आणि इतर संबंधित परिणाम निर्देशक निश्चित करण्यात यावेत.

१८. सुधारणांची पुनरावृत्ती व विस्तार:-

एखाद्या विभागात, जिल्ह्यात किंवा क्षेत्रात राबविण्यात आलेली सुधारणा यशस्वी ठरल्यास तिचे दस्तऐवजीकरण करून ती इतर विभाग, जिल्हे किंवा सेवांमध्ये लागू करता येईल का, याचे परीक्षण करण्यात यावे. आवश्यकतेनुसार अशा सुधारणांसाठी स्वतंत्र Reform Replication Note तयार करण्यात यावी.

१९. राज्यस्तरीय समन्वय यंत्रणा:-

अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, आंतर-विभागीय समन्वय, संनियंत्रण, मार्गदर्शन आणि केंद्र शासनाशी समन्वय साधण्यासाठी राज्य स्तरावर “राज्य समन्वय समिती” (State Coordination Committee - SCC) गठित करण्यात येत आहे. समितीची सविस्तर रचना परिशिष्ट-२ मध्ये नमूद करण्यात आली आहे.

राज्य समन्वय समितीमार्फत राज्य कृती आराखड्यास मान्यता देणे, अभियानास धोरणात्मक दिशा देणे, विविध प्रशासकीय विभागांमध्ये आवश्यक समन्वय सुनिश्चित करणे, बहुविभागीय व संरचनात्मक स्वरूपाच्या सुधारणांवर आवश्यक निर्णय घेणे, विभागनिहाय प्रगतीचा आढावा घेणे, अभियानाच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर करण्यासाठी आवश्यक निर्देश देणे तसेच अभियानाच्या एकूण परिणामांचे संनियंत्रण करणे अपेक्षित राहील.

२०. राज्य नोडल अधिकारी:-

विकास आयुक्त(उद्योग) (Development Commissioner, Industries) हे राज्य समन्वय समितीचे सदस्य सचिव तसेच राज्य नोडल अधिकारी (State Nodal Officer - SNO) म्हणून काम पाहतील. ते भारत सरकारच्या आर्थिक व्यवहार विभाग (DEA), Inter-Ministerial Steering Committee (IMSC) तसेच संबंधित केंद्रीय मंत्रालये/विभाग यांच्याशी महाराष्ट्र राज्याच्या वतीने समन्वय साधतील.

२१. विभागीय नोडल अधिकारी:-

सर्व प्रशासकीय विभागांनी आपल्या विभागासाठी एक विभागीय नोडल अधिकारी नियुक्त करावा. सदर अधिकारी हा विभागातील अधीनस्थ कार्यालये, क्षेत्रीय यंत्रणा व संबंधित संस्थांशी समन्वय साधण्यासाठी तसेच राज्य नोडल अधिकारी यांच्याकडे आवश्यक माहिती व प्रगती अहवाल सादर करण्यासाठी जबाबदार राहील.

२२. जिल्हास्तरीय समन्वय यंत्रणा:-

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली “जिल्हा समन्वय समिती” (District Coordination Committee - DCC) गठित करण्यात यावी. समितीची सविस्तर रचना परिशिष्ट-३ मध्ये नमूद करण्यात आली आहे.

जिल्हा समन्वय समितीमार्फत जिल्ह्यात अभियानाची अंमलबजावणी, जन मंथन कार्यक्रमांचे आयोजन, नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करणे, सूचनांचे संकलन व प्राथमिक छाननी, संबंधित विभागांशी समन्वय, जिल्हास्तरीय संनियंत्रण आणि राज्य नोडल अधिकाऱ्यास प्रगती अहवाल सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२३. केंद्र शासनाशी समन्वय:-

राज्य नोडल अधिकारी हे भारत सरकारच्या आर्थिक व्यवहार विभाग तसेच Inter-Ministerial Steering Committee यांच्याशी आवश्यक समन्वय साधतील. राज्यातील सुधारणा सूचना केंद्र शासनाच्या कार्यक्षेत्राशी संबंधित असल्यास संबंधित बाब केंद्र शासनाच्या सक्षम यंत्रणेकडे पाठविण्यासाठी राज्य नोडल यंत्रणेमार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

२४. माहिती व जनसंपर्क:-

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने संबंधित प्रशासकीय विभागांच्या समन्वयाने राज्यस्तरीय जनजागृती, प्रसार साहित्य, डिजिटल प्रचार, माध्यम व्यवस्थापन आणि अभियानातील उल्लेखनीय सुधारणा व यशोगाथांच्या प्रसारासाठी आवश्यक कृती आराखडा तयार करावा.

जिल्हाधिकारी यांनी जिल्हा स्तरावर स्थानिक माध्यमे, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था आणि उपलब्ध इतर माध्यमांचा प्रभावी वापर करून अभियानाचा प्रसार करावा.

२५. वित्तीय बाब:-

सदर अभियानाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक खर्च संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या विद्यमान मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदींमधून भागवावा. अतिरिक्त आर्थिक भार अपेक्षित असल्यास संबंधित विभागाने वित्त विभागाशी आवश्यक विचारविनिमय करून स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा.

२६. कायदेशीर व प्रशासकीय बाबी:-

अभियानांतर्गत कोणत्याही सुधारणा प्रस्तावाची अंमलबजावणी संबंधित कायदे, नियम, शासन निर्णय आणि सक्षम प्राधिकाऱ्यांच्या अधिकारांच्या अधीन राहील. कायद्यात किंवा नियमांमध्ये सुधारणा आवश्यक असल्यास संबंधित प्रशासकीय विभागाने आवश्यक ती स्वतंत्र कायदेशीर व प्रशासकीय कार्यवाही करावी.

न्यायालयीन किंवा न्यायाधिकरणीय विचाराधीन बाबींमध्ये न्यायालयीन कार्यवाहीवर परिणाम होईल अशी कोणतीही कार्यवाही सुधारणा उत्सव अभियानाच्या माध्यमातून करण्यात येऊ नये.

२७. सनियंत्रण व अहवाल:-

राज्य नोडल अधिकारी यांनी अभियानाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेऊन राज्य समन्वय समितीसमोर प्रगती अहवाल सादर करावा. सर्व प्रशासकीय विभागांनी निर्धारित नमुन्यात आवश्यक माहिती वेळोवेळी सादर करावी.

अभियानाचा मुख्य कालावधी समाप्त झाल्यानंतरही मध्यमकालीन व संरचनात्मक सुधारणांबाबत संबंधित विभागांनी निर्धारित कालावधीत कृती अहवाल सादर करावा.

२८. कालमर्यादांचे पालन:-

या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या जबाबदाऱ्या, टप्पे व कालमर्यादांचे सर्व संबंधित प्रशासकीय विभाग, विभागीय कार्यालये, जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि अधीनस्थ कार्यालयांनी काटेकोरपणे पालन करावे. अभियानातील कोणत्याही टप्प्यावर विलंब झाल्यास संबंधित विभागीय नोडल अधिकारी यांनी विलंबाची कारणे व पुढील कार्यवाहीचा आराखडा राज्य नोडल अधिकारी यांना सादर करावा.

२९. आदेशांचे पालन:-

या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सूचना, जबाबदाऱ्या व कालमर्यादांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुख, विभागीय नोडल अधिकारी, जिल्हाधिकारी व इतर संबंधित सक्षम अधिकारी यांची राहील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९०११२३३४२२७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ATUL NILKANTHRAO PATNE
Date: 2026.09.01 12:34:49 +05'30'

(डॉ. अतुल पाटणे)
शासनाचे प्रधान सचिव

प्रत :

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
४) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
५) मा. उपमुख्यमंत्री, नगरविकास,गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम(सा.उ.) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.(*रिक्त*)
९) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.(*रिक्त*)
१०) सर्व मा.संसद सदस्य/विधानपरिषद सदस्य/विधानसभा सदस्य.
११) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

१२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१३) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७) सर्व विभागीय आयुक्त.
१८) सर्व पोलीस आयुक्त *(पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, वगळून).*
१९) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
२०) सर्व जिल्हाधिकारी.
२१) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त *(बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून).*
२२) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.
२३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२४) निवडनस्ती.

परिशिष्ट - १

सुधारणा उत्सव अभियानाची समन्वय रचना (Governance Framework)

बाब	केंद्र स्तर	राज्य स्तर	प्रमुख भूमिका
समन्वय	केंद्रीय समन्वय समिती - अध्यक्ष, कॅबिनेट सचिव	राज्य समन्वय समिती - अध्यक्ष, मुख्य सचिव	धोरणात्मक दिशा, आंतर-शासकीय समन्वय व संनियंत्रण
नोडल समन्वय	आर्थिक व्यवहार विभाग / IMSC	विकास आयुक्त(उद्योग) - राज्य नोडल अधिकारी	केंद्र-राज्य समन्वय व राज्यस्तरीय संनियंत्रण
विभागीय अंमलबजावणी	केंद्रीय मंत्रालये/विभाग	राज्य प्रशासकीय विभाग	सूचना परीक्षण, वर्गीकरण व सुधारणा अंमलबजावणी
जिल्हा स्तर	संबंधित केंद्रीय यंत्रणा	जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती DCC	जन मंथन, नागरिक सहभाग व जिल्हास्तरीय समन्वय
क्षेत्रीय स्तर	संबंधित यंत्रणा	जिल्हा/तालुका/स्थानिक स्वराज्य संस्था	नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद व सूचना संकलन
डिजिटल संनियंत्रण	केंद्रीय पोर्टल/प्रणाली	रिफॉर्म उत्सव पोर्टल व डॅशबोर्ड	सूचना ते अंमलबजावणीपर्यंत डिजिटल संनियंत्रण

रिफॉर्म उत्सव पोर्टल व डॅशबोर्ड : नागरिकांकडून प्राप्त सुधारणा सूचना, त्यांचे परीक्षण व वर्गीकरण, संबंधित विभागाकडे हस्तांतरण, अंमलबजावणीची सद्य:स्थिती आणि सुधारणा परिणाम यांचे एकात्मिक डिजिटल संनियंत्रण करण्यासाठी रिफॉर्म उत्सव पोर्टल व डॅशबोर्डचा वापर करण्यात येईल.

परिशिष्ट - २

राज्य समन्वय समिती (State Coordination Committee - SCC)

क्र.	समिती सदस्य	भूमिका
१	मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन	अध्यक्ष
२	अपर मुख्य सचिव, गृह विभाग	सदस्य
३	अपर मुख्य सचिव, महसूल विभाग	सदस्य
४	अपर मुख्य सचिव, नगर विकास-१	सदस्य
५	अपर मुख्य सचिव, नगर विकास-२	सदस्य
६	अपर मुख्य सचिव (प्र.ना., उ. व सु.), सा.प्र.वि.	सदस्य
७	प्रधान सचिव, उद्योग विभाग	सदस्य
८	प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय	सदस्य

क्र.	समिती सदस्य	भूमिका
९	सचिव, ग्रामविकास विभाग	निमंत्रित सदस्य
१०	सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग	सदस्य
११	महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय	सदस्य
१२	आवश्यकतेनुसार संबंधित विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव किंवा त्यांचे प्रतिनिधी	निमंत्रित सदस्य
१३	विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई	सदस्य सचिव व राज्य नोडल अधिकारी

टीप : अभियानाच्या स्वरूपानुसार व आवश्यकतेनुसार मुख्य सचिव यांच्या मान्यतेने समितीमध्ये अतिरिक्त सदस्यांचा समावेश करता येईल.

परिशिष्ट - ३

जिल्हा समन्वय समिती (District Coordination Committee - DCC)

क्र.	समिती सदस्य	भूमिका
१	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२	पोलीस अधीक्षक / पोलीस आयुक्त	सदस्य
३	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	सदस्य
४	आयुक्त, महानगरपालिका / मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत	सदस्य
५	जिल्हा माहिती अधिकारी	सदस्य
६	जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक / जिल्हा उद्योग अधिकारी	सदस्य
७	जिल्हा नियोजन अधिकारी	सदस्य सचिव
८	आवश्यकतेनुसार संबंधित विभागांचे जिल्हास्तरीय अधिकारी	निमंत्रित सदस्य

परिशिष्ट - ४

सुधारणा उत्सव अभियानाची टप्पानिहाय कालमर्यादा

टप्पा	कालावधी	प्रमुख कार्यवाही
तयारी व संवेदीकरण	ऑगस्ट - सप्टेंबर २०२६	समित्या, नोडल अधिकारी, संवेदीकरण व State Action Plan
जनजागृती	११ सप्टेंबर २०२६ पासून	राज्यव्यापी जनजागृती व नागरिक सहभाग
जन मंथन - शोध	०२ ते ३१ ऑक्टोबर २०२६	नागरिकांकडून सुधारणा सूचना संकलन
विमर्श - परीक्षण	१० ऑक्टोबर ते	विभागीय परीक्षण, विचारविनिमय व वर्गीकरण

टप्पा	कालावधी	प्रमुख कार्यवाही
	३० नोव्हेंबर २०२६	
जन समाधान - अंमलबजावणी	१० ऑक्टोबर ते २० डिसेंबर २०२६	Quick Wins अंमलबजावणी व Reform Plans
संकल्प सिद्धी	२५ - २७ डिसेंबर २०२६	कामगिरीचे सादरीकरण, गौरव व यशोगाथा
पाठपुरावा	२८ डिसेंबर २०२६ पासून पुढे	मध्यमकालीन व संरचनात्मक सुधारणांचा पाठपुरावा

परिशिष्ट - ५

“सुधारणा” निश्चितीचे पाच निकष

क्र.	निकष	तात्पर्य
१	सर्वसाधारणता (Generality)	सूचना केवळ एका अर्जदारापुरती मर्यादित नसून समान परिस्थितीतील सर्वांना लागू होणारी असावी.
२	संरचनात्मक मूळ कारण (Systemic Root Cause)	सूचना नियम, प्रक्रिया, तंत्रज्ञान किंवा संस्थात्मक रचनेतील मूळ अडथळ्यावर उपाय करणारी असावी.
३	भविष्यलक्ष्यी (Prospective)	भविष्यातील कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणणारी असावी.
४	पुनरावृत्तीक्षम/व्याप्तीक्षम (Replicable/Scalable)	सुधारणा व्यापक प्रमाणावर लागू करता येण्याजोगी असावी.
५	रचनात्मक (Constructive)	सूचनेमध्ये अमलात आणता येण्याजोगा ठोस बदल किंवा उपाय असावा.

परिशिष्ट - ६

सुधारणांमधून वगळण्यात येणारे प्रवर्ग

प्रवर्ग	वर्णन
वैयक्तिक तक्रार	अर्जदाराच्या स्वतःच्या प्रलंबित प्रकरणाचे, व्यवहाराचे अथवा हक्काचे निराकरण मागणारी सूचना.
आक्षेपार्ह / द्वेषपूर्ण / स्पॅम / अरचनात्मक मजकूर	कोणतीही रचनात्मक प्रशासकीय मागणी नसलेला, व्यक्ती/समूहास लक्ष्य करणारा अथवा स्पॅम स्वरूपाचा मजकूर.
स्थळनिश्चित पायाभूत सुविधा मागणी	विशिष्ट ठिकाणी रस्ता, पूल, शाळा, महाविद्यालय, रुग्णालय अथवा अन्य पायाभूत सुविधा निर्माण करण्याची मागणी.
वेतन / सेवाशर्ती मागणी	स्वतःसाठी अथवा विशिष्ट संवर्गासाठी वेतन, भत्ता, पदोन्नती अथवा

प्रवर्ग	वर्णन
	सेवाशर्तीतील बदलाची मागणी.
कर दर / शुल्कातील ठराविक बदल	विशिष्ट कर दर, कर-स्लॅब अथवा शुल्कामध्ये बदल करण्याची मागणी. तथापि, प्रक्रिया अथवा अनुपालन सुलभीकरणाबाबतची सूचना सुधारणा म्हणून विचारात घेता येईल.
राजकीय / अकृतिशील सूचना	विशिष्ट सेवा, प्रक्रिया, नियम अथवा संस्थात्मक व्यवस्थेशी संबंध नसलेली सर्वसाधारण मते अथवा घोषणा.
आधीच अमलात असलेली बाब	संबंधित सुधारणा आधीच शासनाच्या विद्यमान कार्यपद्धतीत अमलात असल्यास.
प्रक्रियेत असलेली बाब	संबंधित सुधारणा किंवा बदलाबाबत शासन स्तरावर आधीच प्रक्रिया सुरू असल्यास.
न्यायप्रविष्ट बाब	न्यायालयीन किंवा न्यायाधिकरणीय कार्यवाहीच्या अधीन असलेली बाब.
व्यक्तिनिष्ठ अपवादाची मागणी	विद्यमान सर्वसाधारण नियमातून एखाद्या व्यक्ती/संस्थेसाठी स्वतंत्र अपवाद निर्माण करण्याची मागणी.

टीप : एखाद्या वैयक्तिक तक्रारीतून शासनाचे नियम, प्रक्रिया, तंत्रज्ञान किंवा संस्थात्मक व्यवस्थेतील सर्वसाधारण स्वरूपाची त्रुटी निदर्शनास येत असल्यास, त्या तक्रारीतील संरचनात्मक मुद्द्याचा स्वतंत्र "सुधारणा सूचना" म्हणून विचार करता येईल.